विकास योजना शेवगांव
जिल्हा अहमदनगर

---

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना
अधिनियम १९६६ चे कलम ३१[१]अन्वये
अंतिम ~~मुदतवाढ~~ देणेबाबत-

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:टिपीएस१९८६/४७०/सीआर६१/८६ नांवि.१७
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक ~~२०.२.८७~~ 10.3.88

पहा - १] अध्यक्ष, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे क्रमांक जीएडी/२/टीपी/६६५/८३ दिनांक १.१०.८३ चे पत्र

२] संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक वियो/शेवगांव/टीपीव्ही-१३/१७७१ दिनांक २८.२.८६चे पत्र

शासन निर्णय- सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ मं. वि. कुळकर्णी ]
अवर सचिव

प्रति-

आयुक्त नाशिक विभाग नाशिक
जिल्हाधिकारी, अहमदनगर
संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे
उपसंचालक, नगर रचना नाशिक विभाग नाशिक
सहायक संचालक, नगर रचना अहमदनगर
महसूल व वन विभाग, मंत्रालय
ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई
अध्यक्ष, जिल्हा परिषद अहमदनगर
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय पुणे

यांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबत पाठविलेली अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग १ नाशिक विभाग पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी १० प्रती हया विभागास व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांस पाठवाव्यात.

TOWN PLANNING & VALUATION ... AHMEDNAGAR
... 558
20/3/88

अ धि सू च ना

नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
दिनांक ~~२०.२.१९८७~~ १०.३.८५

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६,

जा. क्र. टिपीएस १९८४/४७०/सीआर-६१/८६/युडी-१७ [२]

ज्या अर्थी अहमदनगर जिल्हा परिषदेने [ह्यापुढे जेथे जेथे संदर्भ येईल तेथे तेथे "उक्त जिल्हा परिषद" असा उल्लेख केला आहे. ] महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे [हयापुढे जेथे जेथे संदर्भ येईल तेथे उक्त अधिनियम"असा उल्लेख केला आहे ]कलम २[१५][क] मधील तरतूदीनुसार प्रदान केलेल्या शक्तीनुसार १३ ऑगस्ट १९७९ हया दिनांकास तिच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. २९ नुसार शेवगाव ग्राम पंचायतीच्या [हया पुढे जेथे जेथे संदर्भ येईल तेथे "उक्त ग्राम पंचायत" असा उल्लेख केला आहे ]संपूर्ण हद्दीकरीता प्रारूप विकास योजना [हयापुढे जेथे जेथे संदर्भ येईल तेथे "उक्त विकास योजना"असा उल्लेख केला आहे ]तयार करण्याचाइरादा उक्त अधीनियमाचे कलम २३[१]नुसार जाहीर करून त्याचे प्रसिध्दीकरण महाराष्ट्र शासनाच्या १३ डिसेंबर १९७९ हया दिनांकास प्रसिध्द झालेल्या राज्यपत्राच्या भाग-१ पुणे विभागीय पुरवणीमध्ये पान के. ४०६५ व ४०६६ वर केले आहे,

आणि ज्या अर्थी, उक्त जिल्हा परिषदेने उक्त ग्राम पंचायतीच्या हद्दीतील क्षेत्राचे सर्वेक्षण केल्यानंतर उक्त विकास योजना आराखडा तयार करून उक्त अधिनियमाचे कलम २६[१] नुसार २७ मार्च १९८० हया दिनांकास प्रसिध्द केला,

आणि ज्या अर्थी, उक्त जिल्हा परिषदेने, उक्त विकास योजना आराखड्या-संबंधात उक्त अधिनियमाच्या कलम २८ नुसार विहित मुदतीत आलेल्या हरकती सुचनांच्या विचार करून उक्त विकास योजनेच्या आराखड्यामध्ये काही ठळक स्वरूपाचे फेरफार सुचविल्यामुळें अशा फेरफाराशी संबंधीत इसमांकडून त्यावर सुचना वा आक्षेप मार्गविण्या करिता उक्त अधिनियमाचे कलम २९ नुसार अशा फेरफार राजपत्रित तसेच स्थानिक वृत्तपत्रात पुन: प्रसिध्दी देणे आवश्यक झाले,

आणि ज्या अर्थी, उक्त जिल्हा परिषदेने उक्त अधिनियमाच्या कलम २९ अन्वये उक्त विकास योजना आराखडा ठळक स्वरूपाच्या फेरफारासह दि. १६ जुन १९८२ रोजी पुन:प्रसिध्द केला असुन या त्या विषयीची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे दि. १४ ऑक्टोबर १९८२ या दिनांकास प्रसिध्द झालेल्या राजपत्राच्या भाग १ नाशिक विभागीय पुरवणीमध्ये पान क्र. २३४१ व २३४२ वर प्रसिध्द केली आहे,

आणि ज्या अर्थी उक्त जिल्हा परिषदेने वरीलप्रमाणे पुन:प्रसिध्द केलेल्या सुधारणा-फेरफारा संबधात विहीत मुदतीत आलेल्या सुचना हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ नुसार उक्त

विकास योजना आराखडयामध्ये काही किरकोळ स्वरुपाच्या सुधारणा केल्यास व असा सुधारित विकास योजना आराखडा महाराष्ट्र शासनास उक्त अधिनियमाचे कलम ३० नुसार मंजूरी मिळविण्यासाठी १ ऑक्टोबर १९८३ या दिनांकास सादर केला आहे,

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र शासनास, उक्त अधिनियमाचे कलम ३१[१] नुसार विकास योजना आराखडयास मंजूरी देण्यासाठी लागणारी मुदत योग्य त्या कालावधीसाठी वाढविण्याच्या तरतुदी नुसार महाराष्ट्र शासनाने अशी मुदत प्रस्तुतकामी २५.५.८८ हया दिनांकापर्यंत वाढविली असून तशी अधिसूचना क्रमांक टीपीएस१९८६/४७०/सीआर-६१/८६/युडी.१७/अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे., /दिनांक १०.३.८७

आणि ज्या अर्थी, सोबतच्या सूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे गौण स्वरुपाच्या काही सुधारणासह उक्त विकास योजना आराखडयास मंजूरी देण्याचे शासनाने प्रस्ताविले आहे,

त्या अर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ [१] नुसार प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन आणि संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी विचार विनिमय करुन महाराष्ट्र शासन या अधिसूचनेव्दारे,

अ] उक्त विकास योजना आराखडयास सोबतच्या सूचीमध्ये दिल्यानुसार काही किरकोळ स्वरुपाच्या सुधारणांसह मंजूरी देत आहे, व

ब] असा शासनाने मंजूरी दिलेला उक्त विकासयोजना आराखडा १.६.८८ हया दिनांकापासून अंमलात येईल असे निश्चित करित आहे.

टिप्पणी

शासनाने अंतीम मंजूरी दिलेला असा उक्त विकास योजना आराखडा अहमदनगर जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येईल वतो सदर जिल्हापरिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत संबंधित नागरिकांच्या अवलोकनासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी ठेवणेत येईल.

महाराष्ट्र शासनाच्या राज्यपालांच्या नावाने,
व आदेशानुसार.

मं. वि. कुळकर्णी
अवर सचिव महाराष्ट्र शासन

# सुधारणांबाबतची सुची

१] स.नं. १५ व १६ मध्ये धनगर समाजास खंडोबाची यात्रा भरविण्यासाठी देणगी देण्यांत आलेली ३.८१ हेक्टर [ एकर ] जमीन ही" "अस्तित्वांतिल खुली जागा "म्हणुन[शहर विकास योजनेत रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे] संबोधण्यात येईल.

२] वर क्र[१] मध्ये उल्लेखिलेल्या स.नं. १५ व १६ मधील दक्षिणेकडील काही भागात खंडोबा यात्रे करिता म्हणुन दर्शविलेली दोन आरक्षणे अनुक्रमे क्र. ६८-अ व ६८-ब ही त्यामुळे [विकास योजनेत मावा रंगाने दर्शविल्यानुसार] साहजिकच आपोआप रद्द होतील. आणि आरक्षणातुन मुक्त अशी जमीन निवासी विभागात तथा वरील क्र. १ मधील अस्तित्वातील खुल्या जागेत सामील केली जाईल.

३] वरील[१] मधील उल्लेखिलेल्या अस्तित्वातील खुल्या जागेच्या उत्तरे-कडील बरेच क्षेत्र ज्या आरक्षणामध्ये सामील केलेले आहे असे स.नं. १६ मधील विस्थापितांचे पुनर्वसनासाठी [Housing for Dishoused persons ]म्हणून ठेवण्यात आलेले [स्थलांक क्र. ३४] विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार] आरक्षण रद्द करणेत येईल व आरक्षणातुन मुक्त केलेली अशी जमीन रहिवाशी विभागात सामील करण्यात येईल.

४] स.नं. १५ व १२ पै. मिळुन "खेळाचे मैदान"म्हणून आरक्षित करण्यात आलेले [स्थलांक क्र. ६१]क्षेत्र सदर आरक्षणांतुन वगळण्यात येईल व आरक्षणातुन मुक्त अशी ही जमीन विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार रहिव क्षेत्रात सामील केली जाईल.

५] स.नं. १४ व १५ भाग मिळुन "प्राथमिक शाळा" म्हणुन आरक्षित करण्यात आलेले [स्थ.क्र. ६२]क्षेत्र सदर आरक्षणातुन वगळण्यांत येईल व आरक्षणातुन मुक्त अशी जमीन विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार रहि विभागात सामील केली जाईल.

६] स.नं. १४ व १५ भाग मिळुन "बगीचा"म्हणुन आरक्षित करण्यांत आलेले [स्थ.क्र. ६३]क्षेत्र आरक्षणातून वगळण्यात येईल व आरक्षणातुन मुक्त अशी जमीन विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार रहिवास क्षेत्रात सामील केली जाईल.

७] स.नं. १४ व १५ मधुन जाणारा १२ मी [४० फूट] रुंदीचा नियोजित अर्धवर्तुळ कार रस्ता[वरिल अनु. ६ मध्ये उल्लेखिलेल्या स्थलांक क्र. ६३ च्या पूर्व व दक्षि अंगाने जाणारा]आरक्षणातुन वगळण्यात येईल व आरक्षणातुन मुक्त अशी ही जमीन विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार रहिवास ~~क्षेत्र~~ क्षेत्रात सामील केली जाईल.

८] स्थानांक क्र. ४५, ४६, ४७ हया निवासी माध्यमिक विद्यालयाच्या विस्तारा साठी [Extension to Residential Highschool]म्हणून करण्यात आले आरक्षणातील समुचित प्राधिकरण म्हणून "प्राचार्य, निवासी माध्यमिक विद्या या ऐवजी "अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज, शेंवगांव"अशा त-हेचा बदल करणेत येईल व त्याप्रमाणे विकास योजना अहवालातील [माव रंगाने दर्शविल्यानुसार]संबंधीत तक्ता क्र. १७ मध्ये उचित नोंद घेण्यात येईल

९] स. नं. १०[ग. नं. ७२२/१]पैकी विद्युत मंडळाचे विद्यमान केंद्रालगत दक्षिणेकडील "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विस्तारासाठी म्हणून आरक्षित करण्यात आलेल्या क्षेत्राने [अनुक्रमे आरक्षण क्र. ४९ व क्र. ५८-अ ने] बाधित झालेली, नियोजित अंबिका/तीसगांव मार्गे जाणा-या रस्त्यावर दक्षिणी बाजू असलेली ७४ आर जमीन सदर आरक्षणातून वगळण्यात येईल व अशी आरक्षणातून मुक्त केलेली जमीन विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार रहिवास विभागात सामील करण्यात येईल.

/सहकारी गृहनिर्माण संस्थेने खरेदी केलेली, शिवगांव नगर

१०] वरिल क्र. [९]मधील बदलाच्या अनुषंगाने "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विस्तारासाठी"म्हणून राखुन ठेवण्यात येणारी आरक्षणे क्र. ४९ व ५८-अ ची क्षेत्रे अनु. ०.०७४ हेक्टर व २.८७ हेक्टर इतकी शिल्लक रहातील.

११] स. नं. ६ व ८ मध्ये अस्तित्वात असलेल्या जिनिंग प्रेसच्या पूर्वेकडील कोप-यात "दवाखाना व प्रसूतीगृह" म्हणून नियोजण्यात आलेल्या [स्थ क्र. ३६] आरक्षणाचे क्षेत्र ०.३३ हे वरुन ०.१५ हे. इतके कमी करण्यात येईल व अशी आरक्षणातुन मुक्त केलेली जमीन विकास योजना नकाशावर मावा रंगा दर्शविल्यानुसार लगतच्या अस्तित्वातील औद्योगिक वापरामध्ये सामील करण्यात येईल.

१२] स. नं. ११९ मध्यें स्थलांक क्र. ५३ अन्वये "प्राथमिक शाळा" म्हणून राखुन ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे क्षेत्र ०.६४ हेक्टर वरुन ०.४० हेक्टर इतके कमी करण्यात येईल तसेच हया सुधारित आरक्षणामध्ये लगत स्थलांक क्र. ५४ पै. वगळलेले क्षेत्र सामील करण्यात येईल. आरक्षणाचा सुधारित आकार विकास योजना नकाशावर "मावा"रंगाने दाखविल्यानुसार राहिल. तसेच सदर आरक्षणातुन मुक्त क्षेत्र विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार रहिवास विभागात सामील केले जाईल.

१३] स. नं. ११८ व ११९ पै. जमीनीत स्थलांक क्र. ५४ अन्वये "दवाखाना" म्हणून राखुन ठेवण्यात आलेले क्षेत्र ०.३९ हेक्टर वरुन ०.२० हेक्टर इतकेकमी करण्यात येईल. सदर आरक्षणाचा सुधारित आकार हा विकास योजना नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार राहील. तसेच आरक्षणाचा हेतु "दवाखाना तथा सुतीकागृह"असा राहिल.

१४] स. नं. ११५ मध्ये नियोजिण्यात आलेले स्थलांक क्र. ५६ हया "दुकान केंद्राच्या" आरक्षणाचा आकार व क्षेत्र विकास योजना नकाशावर मावा रंग दर्शविल्यानुसार बदलण्यात येईल व अशा सुधारित आरक्षणाचे क्षेत्र ०.२० हेक्टर इतके राहील तसेच अशा सुधारित आरक्षणाचा हेतु निव्वळ "दुकान केन्द्रा"ऐवजी "दुकानकेंद्र तथा भाजी बाजार असा राहील व अशा आरक्षणातुन मुक्त झालेले क्षेत्र रहिवास विभागात सामील केले जाईल.

१५] स. नं. १४ व १५ पै. जमीनीत नियोजिण्यात आलेल्या माध्यमिक शाळेच्या आरक्षणाच्या [स्थ. क्र. ६४]ईशान्य कोप-यांत "शेवगांव बीड" रस्त्यावर दर्शनी बाजू येईल अशा त-हेने "दुकान केंद्र तथा भाजी बाजार" म्हणून विकास योजनेत नकाशावर मावा रंगाने दर्शविल्यानुसार नविन आरक्षण करण्यात येईल. सदर आरक्षणाचे क्षेत्र ०.२० हेक्टर इतके राहील व हयास स्थलांक क्र. ६८ असा दिला जाईल.

१६] वरील क्र. [१५]मधील बदलाचे अनुषंगाने स्थलांक क्र. ६४ या " माध्यमि लया"करिता राखुन ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे क्षेत्र आता ०.८६ हे राहील.